# <u>एम.ए. व एम. कॉम. द्वितीय वर्ष प्रवेश मुदतवाढ सूचना</u>

**(शैक्षणिक वर्ष २०२२-२३)**

मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रथम वर्ष एम.ए. व एम. कॉम. या वर्गामध्ये प्रवेश घेतलेल्या उत्तीर्ण अथवा ATKT मिळालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी एम.ए.व एम.कॉम. द्वितीय वर्ष या वर्गामध्ये प्रवेश घेता येईल, तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष एम.ए. व एम.कॉम. या वर्गामध्ये प्रवेश घेतलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये द्वितीय वर्षास प्रवेश घेतला नाही, अशा उत्तीर्ण अथवा ATKT मिळालेल्या विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी एम.ए. व एम. कॉम. द्वितीय वर्ष या वर्गामध्ये प्रवेश घेता येईल. सदर प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने <u>दि.०५/०१/२०२३</u> पर्यंत **सकाळी११:००** वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. यानंतर अनेक विनंती अर्ज प्राप्त झाले आहेत.

**एम.ए.व एम.कॉम. द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया दि.१६/०१/२०२३ पर्यंत सकाळी११:०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यात आलेली आहे याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

विद्यार्थ्यांना http://unipune.ac.in/SOL/admission23.html या संकेतस्थळावर **"मुक्त अध्ययन प्रशाळेच्या जुन्या विद्यार्थ्यांसाठी पुढील वर्गात प्रवेश घेण्याकरीता अर्ज"** या विभागाअंतर्गत लॉगिन करून प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्क भरावे. लॉगिन करण्यासाठी PRN हा user name साठी आणि yymmdd या स्वरुपात जन्मदिनांक password साठी वापरावे. प्रवेश अर्ज व शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरल्यानंतर प्रवेश अर्ज व शुल्क पावतीची प्रिंट घेऊन जपून ठेवावी. सदर प्रिंट अभ्यास केंद्रावर जमा करण्याची आवश्यकता नाही.

Sd/-

**संचालक**

मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा